तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dte.org.in Internet : ww.dte.org.in

महत्त्वाचे/कालमर्यादित
२०.०३.२०१५

क्रमांक : १०/पदविका/एआरसी/बॅकेचे प्रपत्र/२०१५/ २१७
दिनांक : 17 MAR 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय :- शासनामार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस/एनईएफटी मार्फत करण्यासाठी आवश्यक माहिती सादर करण्याबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण १०१०/प्र.क्र. ६८/कोषा प्र-५ दिनांक १८.८.२०११.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनामार्फत होणारी सर्व प्रदाने ईसीएस/एनईएफटीची सुविधा वापरुन करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. ईसीएस/एनईएफटी व्दारे प्रदान करण्यासाठी आवश्यक तपशिलाचे विवरणपत्र शासनाने निर्धारित केले आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र इ. अभ्यासक्रमाच्या प्रवेश स्विकृती केंद्राकडुन (एआरसी) शासनाच्या प्रपत्रामध्ये माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे. आपल्या अधिपत्याखालील सर्व एआरसीची माहिती मुळ प्रतीत एकत्रित संकलित करुन ती या **संचालनालयास दिनांक २०.३.२०१५ पर्यंत** जमा करण्यात यावी. आपल्या अधिपत्याखालील सर्व एआरसीची माहिती संकलित झाली आहे याची खातरजमा करुनच ही माहिती आपल्या कार्यालयामार्फत या संचालनालयास जमा करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत संस्थांना या संचालनालयास थेट माहिती सादर करण्यास कळविण्यात येऊ नये.

संचालनालयाकडुन संस्थांना अदा करावयाच्या रकमांसाठी सदर माहिती आवश्यक असल्यामुळे या प्रकरणी त्वरीत माहिती घेण्यात यावी व तशा सूचना सर्व एआरसीना त्वरीत निर्गमित करुन माहिती संकलित करुन संचालनालयास सादर करण्यात यावी. माहिती देण्यासाठीचे प्रपत्र "जोडपत्र-अ" सोबत जोडत आहे

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.
क्र :–तंशिसं/विकाना/पदविका/एआरसी/२०१५/ 805
दि. 17 MAR 2015

प्रति,
प्राचार्य,
प्रथम /द्वितिय वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका एआरसी केंद्र असलेल्या संस्था, नागपूर विभाग .

सर्व प्रथम/द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदविका एआरसी केंद्र असलेल्या संस्थाना कळविण्यांत येते की, सोबतच्या जोडपत्रातील माहिती त्वरित या कार्यालयात त्वरित सादर करावे .

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०१०/ प्र.क्र ६८/ कोषा प्र-५, दिनांक १८ एप्रिल, २०११ चे सहपत्र

## जोडपत्र-अ

ईसीएस/ एनईएफटी/द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१. संस्थेचे नाव व डीटीई कोड

२. कार्यालयाचे नाव व पत्ता

३. बँक खाते क्रमांक

४. बँक खात्याचा प्रकार

५. बँकेचे नाव

६. बँक शाखेचे नाव व पत्ता

७. बँक शाखेचा संकेतांक

८. एमआयसीआर क्रमांक

९. आयएफएससी संकेतांक

दिनांक : संस्थाप्रमुखांची सही

**बँकेचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

बँक शाखा प्रमुख

......... (बँक शाखेचे नाव व शिक्का )

D:\Budage\2015-16\General Correspondence\IFSC code of institutes.docx